# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील कर्जबुडवे सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका तसेच अन्य संस्थांना कर्ज हमी न देण्याबाबतच्या निर्णयाबाबत**

**(१) २२३९३ (२३-०९-२०१५). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कर्जबुडवे सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका तसेच अन्य संस्थांना कर्ज हमी न देण्याचा निर्णय राज्याच्या अर्थविभागाने घेतल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी अशा किती साखर कारखाने, सहकारी बँका व संस्थाचे कर्ज हमी रोखण्यात आले आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच यासंदर्भातील निर्णयाची अंमलबजावणी केव्हापर्यंत करण्यात येणार आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०१-२०१९) :** (१) सहकारी संस्थांना कर्ज हमी न देण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाच्या वित्त विभागाने घेतलेला नाही.

(२) व (३) प्रश्न उदभवत नाही.

---

**मोहाडी (जि.भंडारा) येथे मागासवर्गीय वसतीगृह सुरु करण्याबाबत**

**(२) ५०४९४ (३०-११-०००२). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी जि.भंडारा येथे मागासवर्गीय वस्तीगृह सुरु करणेबाबत मा. सामाजिक न्याय मंत्री यांना दि.१६-३-२०१५ रोजी वा त्या सुमारास विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-१२-२०१८) :** (१) होय.
(२) सध्या नविन वसतीगृह मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय विश्रामगृहात एच.आय.व्ही. बाधित विद्यार्थ्यांसाठी जागा राखीव ठेवण्याबाबत**

**(३) ८४२३१ (२१-०४-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत शासकीय विश्रामगृहात एच.आय.व्ही. बाधित विद्यार्थ्यांसाठी जागा राखीव ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुदानित आश्रमशाळांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(४) ८४८११ (१८-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुदानित आश्रमशाळांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत दिनांक १ मार्च,२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट नेमण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यदर प्रकरणी याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अहवालात नमूद केलेल्या शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) असल्यास, सदरहू शिफारसींची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) होय.
(२) मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या समितीच्या चार बैठका घेण्यात आलेल्या असून, दि.०१ जून, २०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये या संस्थामधील प्रवेशितांची माहिती मागविण्यात आलेली असून, सदर माहिती प्राप्त होताच समितीची बैठक घेण्यात येऊन परिपोषण अनुदान वाढविण्याबाबत शासनास शिफारस करण्यात येईल व समितीच्या शिफारशीनुसार शासन त्यावर निर्णय घेईल
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अलिबाग (जि.रायगड) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी वा तात्पुरत्या हजेरी पटावर सामावून घेण्याबाबत

**(५) ८६७३१ (१८-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ विभागाच्या अखत्यारितील कार्यालयांमध्ये जॉब बेसिस, ठेकेदारी, रेटलिस्ट या पध्दतीने कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना महामंडळामध्ये कायमस्वरूपी वा तात्पुरत्या हजेरी पटावर सामावून घेण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उद्योगमंत्री यांच्याकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पध्दतीने गेली २० ते २४ वर्षापासून कार्यरत असलेल्या टंकलेखक, मदतनीस, माळी पदावर असलेल्या कर्मचाऱ्यांना महामंडळाच्या आस्थापनावर कायमस्वरूपी व तात्पुरत्या हजेरी पटावर सामावून घेण्यात न आल्यामुळे कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या सवलतींचा लाभ मिळत नसल्यामुळे कुटूंबियांचा उदरनिर्वाह करणे कठिण जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि.१०/२/२०१६ रोजी झालेल्या ३६५ व्या बैठकीमध्ये ठराव क्रमांक ५५७० मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा / अभिप्राय नमूद करण्यात आले आहे.

(१) महामंडळाचे परिपत्रक दि.१०/५/२००६ ही तारीख अर्हता दिनांक म्हणून निश्चित करण्यात यावी.

(२) अंशतः रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवर सामावून घ्यावयाच्या व्यक्तींच्या संख्येबाबत तसेच अटी व शर्तींबाबत योग्य त्या सुधारणा करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना देण्यात यावेत.

तथापि, कंत्राटी, दरसूची, जॉब बेसिसवरील कार्यरत असलेल्या व्यक्तींचे कागदपत्रे / पुरावे छाननी करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे सदर यादीतील काही व्यक्तींनी महामंडळाच्या सेवेत कायम करणेकामी विविध न्यायालयात दावे दाखल केले असल्याने तसेच मा.उच्च न्यायालयाने व मा.सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेले तसेच शासनाचे असणारे निर्बंध या सर्व बाबींची विधी ग्राहयता पडताळणी करण्यासाठी उक्त यादी महामंडळाच्या विधी विभागाच्या अभिप्रायाकरीता पाठविलेली आहे.

---

## राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना कंत्राटदारांकडून पुरविण्यात येणाऱ्या भोजनाबाबत

**(६) ८८२१३ (१८-०८-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे १०० वसतिगृहांमध्ये सामाजिक न्याय विभागामार्फत मागसवर्गीय विद्यार्थ्यांसाठी कंत्राटदारांकडून भोजन पुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहामधील विद्यार्थ्यांना कंत्राटदारांकडून भोजन पुरवठा करण्यासाठी सन २०१६ मध्ये वा त्यासुमारास काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने निविदा काढण्यात आल्या असून या प्रक्रियेला मा.उच्च न्यायालयात आव्हान (याचिका दाखल) दिल्याने नवीन निविदा प्रक्रियाही पूर्ण होऊ शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यायालयाच्या परवानगीने पूर्वीच्याच कंत्राटदारांना माहे मार्च, २०१६ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती व त्यानंतर पुढील मुदतवाढ देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर वसतिगृहांमधील कंत्राटदारांना भोजन पुरवठ्याचे गेल्या ७ महिन्याचे पैसेही मिळाले नसल्याने त्यांनी आता भोजन पुरवठा बंद करण्याचे ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा सुरळीत चालू राहण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) होय,

सामाजिक न्याय विभागाकडून चालविण्यात येणाऱ्या २८९ इतक्या शासकीय वसतीगृहांना भोजन पुरवठादारामार्फत भोजन पुरवठा करण्यात येतो.

(२) शासकीय वसतीगृहांचा भोजनठेका ई-निविदा प्रक्रीयेव्दारे राबविण्याबाबत शासनाने दि.१८.०९.२०१५ अन्वये धोरण निश्चित करुन त्यानुसार निविदा प्रक्रीया राबविली होती. तथापि या धोरणासंदर्भात काही संस्थांनी मा.उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता.

मा.उच्च न्यायालयाने सदर धोरणानुसार राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रीयेस स्थागीती दिली होती. त्यानंतर शासनाने दि.२०.०९.२०१७ अन्वये सुधारीत धोरण निश्चित करुन भोजनठेक्यासंदर्भात ई-निविदा प्रकीया राबविली असून, सदर प्रकरणी निवड प्रक्रीया सध्या अंतिम टप्प्यात आहे.

(३) नविन निविदा प्रक्रीया पूर्ण झालेली नसल्याने पूर्वीच्या भोजन पुरवठयास वेळोवेळी मुदत वाढ देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील नाणार येथील पेट्रोलियम रिफायनरी प्रकल्पाबाबत**

**(७) ९००३१ (१८-०८-२०१७) श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील नाणार-कुंभवडे नजीकच्या बाभूलवाडी परिसरांत उभारण्यात येणाऱ्या पेट्रो केमिकल रिफायनरी प्रकल्पाला ग्रामस्थ, शेतकरी, आंबा बागायतदार व मच्छिमारांचा विरोध असल्याचे तक्रार निवेदन ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री रत्नागिरी जिल्हा तसेच जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना
दिनांक ९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी संपादित करण्यात येणारी ७० टक्के जमीन आंबा -काजू लागवडीखाली असून सदर बागायदारांसह लगतच्या विजयदुर्ग खाडीवर मच्छीमारीसाठी अवलंबून असलेला स्थानिक मच्छिमारी व्यवसाय संकटात येणे, प्रदूषण या समस्या निर्माण होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाकरिता किती जमीन संपादीत करण्यात येणार आहे, प्रकल्पबाधित नागरिकांची संख्या किती आहे,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून पेट्रोकेमिकल रिफायनरी प्रकल्प रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-११-२०१८) :** (१) दिनांक २०/०९/२०१७ रोजी पालकमंत्री रत्नागिरी यांना दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे. तसेच दिनांक ०९/०९/२०१७ रोजी व दिनांक २०/०७/२०१७ रोजीचे निवदेन उप विभागीय अधिकारी, राजापूर यांचेकडे प्राप्त झाली आहेत.

(२) हे खरे नाही

मौजे नाणार-कुंभवडे परिसरातील एकूण ५४६१.४६.५० हे. आर. क्षेत्र संपादनाखाली येत असून पैकी ५८९.०० हे आर क्षेत्र बागायती आहे.

(३) राजापूर तालुक्यातील मौजे नाणर-कुंभवडे परिसरामधील एकूण ५४६१.४५.५० हे. आर. असून बाधीत शेतकऱ्यांची संख्या अंदाजे ९३८० आहे.

(४) कायदयातील तरतूदीनुसार भूधारकाच्या संमतीनेच भूसंपादन करण्याचे धोरण शासनाने मान्य केले असल्याने रिफायनरी प्रकल्पाचे भूसंपादन भूधारकांच्या संमतीखेरीज करण्यात येणार नाही. जनतेचा सदर प्रकल्पास विरोध कायम असल्यास जनतेवर शासन प्रकल्प लादणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामाजिक न्याय विभागांतर्गत येणाऱ्या शासकीय वसतीगृहाच्या**
**इमारती जागेअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(८) ९६८९६ (०६-०१-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत येणाऱ्या शासकीय वसतीगृहांच्या इमारती या जागेअभावी प्रलंबित असल्याबाबतची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागाच्यावतीने नागपूर शहरात मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता २६ शासकीय वसतीगृहांपैकी बहुतांश वसतीगृहे ही शासनाच्या उदासीन धोरणामुळे दरवर्षी कोट्यावधी रुपये खर्च करुन खासगी इमारतीत भाडे तत्त्वावर चालविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक न्याय विभागांनी शासनाच्या भाडयापोटी होत असलेला कोटयावधी रूपयाचा खर्च वाचविण्याकरीता नागपूर शहरातील मनपा प्रशासनाच्या अनेक वर्षापासुनच्या बंद पडलेल्या सहा शाळांच्या जागांचा प्रस्ताव मंजुरीकरीता सन २०१५ मध्ये पाठविलेला होता परंतु त्यास अद्यापपर्यंत मनपा प्रशासनाची मंजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर शहरातील मनपाच्या सहा बंद पडलेल्या शाळांच्या जागा सामाजिक न्याय विभाग कोणत्याही अटीवर घेण्यास तयार असतांना सुध्दा अद्यापपर्यंत त्यास मनपाची मंजुरी मिळवुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) होय.

(२) नागपूर जिल्हयातील २५ वसतीगृहे व १ निवासी शाळां यापैकी १० वसतीगृहे शासकीय इमारतीमध्ये सुरु आहेत. तर तालुकास्तरावरील ८ वसतीगृहांसाठी जागा उपलब्ध झालेल्या असून, त्यावर वसतीगृहांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

नागपूर शहरामध्ये वसतीगृहासाठी जागा उपलब्ध होण्यास अडचणी असल्याने तेथे भाडयाच्या इमारतीत वसतीगृह चालविणे क्रमप्राप्त आहे.

(३) होय.

(४) शासकीय वसतीगृहांकरीता जागा मिळण्याबाबत महानगर पालीकेकडे विभागाकडून सतत पाठपुरावा करण्यात येत असून, यासंदर्भातील निर्णय महापालीका स्तरावर प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## धुळे जिल्हयातील हरिजन सेवक संघ संचलित राजेंद्र छात्रालय व काकासाहेब बर्वे कन्या छात्रालयाचे अनुदान व कर्मचाऱ्यांच्या मानधनाबाबत

**(९) ९८३७० (०६-०१-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील हरिजन सेवक संघ संचलित राजेंद्र छात्रालय व काकासाहेब बर्वे कन्या छात्रालय यांचे मागील १४ महिन्यांपासून अनुदान व कर्मचाऱ्यांचे मानधन थकले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे दलितमित्र झुबरलाल शर्मा व छात्रालयाचे विद्यार्थी यांनी त्यांचे अनुदान व मानधन मिळण्याबाबत उपोषण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर छात्रालयांचे थकीत अनुदान व कर्मचाऱ्यांचे मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) राज्यातील काही वसतीगृहे शासन मान्यता नसतांनाही चालविण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे अशा अनुदानित वसतीगृहांची तपासणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता,

जिल्हा हरिजन सेवक संघ संचलित राजेंद्र छात्रालय व काकासाहेब बर्वे कन्या छात्रालय जि.धुळे या वसतीगृहांनी त्यांचे मुळ मान्यता आदेश सादर न केल्याने राज्यमंत्री (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या वसतीगृहांची सुनावणी घेऊन सुनावणीमध्ये हे वसतीगृह अनुदानास पात्र आढळून आल्याने त्यांचे अनुदानाचे आदेश आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे स्तरावरुन देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृहासाठी भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीचे भाडे अदा करण्याबाबत**

**(१०) ९९२६३ (०६-०१-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृहाकरीता सन २०१२ पासून भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीचे भाडे पाच वर्षाचा कालावधी होऊनही करारानुसार दिले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे भाडे मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर भाडे संबंधितांना त्वरीत अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) नाही.

इमारत मालकास दि.१५.१०.२०११ ते दि.३१.३.२०१४ या कालावधीचे भाडे अदा करण्यात आलेले आहे. तर दि.१.४.२०१४ ते दि.३१.३.२०१७ पर्यंतच्या भाडे प्रस्तावामध्ये असलेल्या त्रुटी दुर करुन या कालावधीच्या भाडे प्रस्ताव मंजूरीची कार्यवाही चालू आहे.

(२) होय.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यात दिघी पोर्ट औद्योगिक क्षेत्रासाठी होत असलेल्या सक्तीच्या भूसंपादनाबाबत.**

**(११) १००९३८ (१८-०१-२०१८). श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात दिघी पोर्ट औद्योगिक क्षेत्रासाठी होत असलेल्या जमिन संपादनाबाबत शेतकऱ्यांवर सक्ती केली जाणार नाही तसेच भातशेती, बागायती, घराखालील जमिनी वगळण्यात येतील याबाबतच्या मा.उद्योग मंत्री यांनी विधानपरिषदेत दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी संबंधित भूमीसंपादन अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कार्यवाही केली आहे काय वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर रोहा माणगाव व पानसई औद्यौगिक क्षेत्रातील पहिल्या टप्प्यातील १० गावांचे भूसंपादनाची कार्यवाही उपजिल्हाधिकारी काळ प्रकल्प २ माणगाव व उप विभागीय अधिकारी माणगाव यांचेमार्फत चालू आहे. त्यामधील ३१९८.६६ हे. आर क्षेत्रापैकी ८७% टक्के क्षेत्राची संमती प्राप्त झाली असून २४६७.६६ हे.आर. क्षेत्र महामंडळाच्या ताब्यात आलेले आहेत. तसेच मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे पानसई व रोहा माणगाव औद्योगिक क्षेत्रातील १० गावांमधील संमती अप्राप्त गावठाणाजवळील भात शेती असलेले जमीनीचे क्षेत्र, बागायती व घराखालील जमिनीच्या क्षेत्राबाबतची माहिती घेण्यात आली असून सदर क्षेत्र संमतीप्राप्त क्षेत्रालगत आहे किंवा कसे तसेच सदर क्षेत्रालगतच्या क्षेत्राकरिता मोबदला वाटप झाला असल्यास बाजुचे क्षेत्र वगळल्यानंतर सलगता नष्ट होणार नाही याची पडताळणी करण्याचे काम सुरु आहे.

---

## वरुड व मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पायाभूत सुविधांचे काम पूर्ण करण्याबाबत.

**(१२) १०३०२५ (१३-०७-२०१८). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरुड व मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत पायाभूत सुविधांचे काम दिनांक १० ऑगस्ट, २०१६ पूर्वी पूर्ण करण्याचे कंत्राट छत्रपती संभाजी राजे संस्था अमरावती या संस्थेला देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वारंवार नोटीस देवूनही सदर संस्थेने उक्त काम पूर्ण न केल्यामुळे या संस्थेची अनामत रक्कम जप्त करुन नव्याने निविदा काढून हे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री, उद्योग यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-१२-२०१८) :** (१) व २) हे खरे आहे.
(३) व (४) महामंडळाने छत्रपती संभाजी राजे संस्था, अमरावती यांचे काम करारनामा कलम सी(३) अंतर्गत दिनांक २४/०८/२०१७ अन्वये वरुड लघु औद्योगिक क्षेत्र व मोर्शी लघु औद्योगिक क्षेत्र येथील कामे काढून घेऊन नवीन कंत्राटदाराकडून कामे जुन्या कंत्राटदाराच्या जबाबदारीवर करारनाम्यातील नियमानुसार कार्यवाही पुर्ण करुन कामाची पुन्हा निविदा

प्रक्रिया पार पाडून नवीन कत्राटदाराकडून काम पुर्ण करुन घेण्यात आले. वरुड लघु औद्योगिक क्षेत्रातील कामे करारनामा क्रमांक बी-१/१६ सन २०१७-१८ अन्वये रुपये १८,४१,९२०/- अंदाजित किमतीची ४.०१% कमी किमतीने आवंटीत करुन दिनांक २६/१२/२०१७ ला पुर्ण केली. तसेच मोर्शी लघु औद्योगिक क्षेत्रातील कामे करारनामा क्रमांक बी-१/१७ सन २०१७-१८ अन्वये रुपये १८,६४,२३४/- अंदाजित किमतीच्या ०.९९% कमी दराने दिनांक २१/०१/२०१६ ला पुर्ण केली. दोन्ही कंत्राटदाराच्या देकारातील फरकामुळे महामंडळाला रुपये १,६०,८७७/- इतका जास्त खर्च करावा लागला व छत्रपती संभाजी राजे संस्था अमरावती यांचे सुरक्षा रक्कम व केलेल्या कामापोटी रुपये १,९९,९९६/- इतके महामंडळाकडे सुरक्षित जमा आहे. त्यामधून जास्तीचा खर्च वसुल करण्यात येत आहे.

---

**चाकण (जि.पुणे) औद्योगिक क्षेत्रामधील शेतकऱ्यांच्या बागायती जमिनीबाबत**

**(१३) १०३३६६ (०१-०१-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि.पुणे) औद्योगिक क्षेत्रामधील टप्पा क्र १ ते ४ मधील शेतकऱ्यांच्या ज्या बागायती जमिनी वगळण्यात आल्या आहेत त्या सर्व जमिनींच्या झोन दाखल्यावर अद्याप महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी राखीव आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना सदर झोनच्या शेऱ्यामुळे घरासाठी बांधकाम करण्यास पीएमआरडीएकडून मान्यता देण्यात येत नसल्याने अनेक शेतकऱ्यांना अडचणी निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वगळलेल्या जमिनीवरील झोन बदलण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कळविले असून त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-११-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून चाकण टप्पा क्र.१ ते ४ विकसीत करण्यात येत असून टप्पा क्र. ३ मधील व त्या लगत पूर्वी प्रदर्शन केंद्रासाठी राखीव ठेवलेल्या जागेवर एमआयडीसीसाठी राखीव असा शेरा झोन दाखल्यावर पीएमआरडीएकडून दलिा जातो. या प्रकरणी पूणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून शासनाव्दारे मंजूर पूणे प्रादेशिक योजनेतील चाकण येथील जमीनी “सेक्टर एम मऔविमसाठी निर्देशित क्षेत्र” दर्शविण्यात आले आहे. त्यामुळे त्यांचेकडून विकास परवानगी देताना “एमआयडीसीसाठी निर्देशित क्षेत्र" अशी टिप नमूद करून आवश्यक ते झोन दाखले देण्यात येतात.

(३) महानगर नियोजनकार (बांधकाम परवानगी) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी कळविल्यानुसार चाकण औद्योगिक क्षेत्रातील ज्या जमीनी महामंडळाकडून अधिसूचीत व विनाअधिसूचीत करण्यात आल्या आहेत त्यांच्या अधिसूचनेच्या प्रती व गाव नकाशे दिनांक

२६/२/२०१८ रोजी महानगर रचनाकार, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना महामंडळस्तरावरून सादर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील जॉब बेसीस रेटलीस्ट व कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत**

**(१४) १०३९६६ (१३-०७-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील जॉब बेसीस रेटलीस्ट व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी अंशत: रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवर आदेश देण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला जिल्ह्यात अशा प्रकारे सन १९९० पासून कार्यरत १३ कर्मचारी व राज्यातील ३६४ कर्मचारी जॉब बेसीस रेटलीस्ट व कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक २९ मार्च, २०१६ च्या संचालक मंडळाच्या ३६६ व्या बैठकीत ठरावही मंजूर झालेला आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांस अंशत: रुपांतरीत अस्थायी आस्थापनेमध्ये सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
जॉब बेसीस, रेटलिस्ट व कंत्राटी व्यक्तींना अंशत: रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवर सामावून घेण्याबाबत विविध लोकप्रतिनिधी, इतर वरिष्ठ स्तरावरुन निवेदने प्राप्त होत आहेत.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३), (४) व (५) होय, हे खरे आहे.
महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि. १०/०२/२०१६ रोजी झालेल्या ३६५ व्या बैठकीमध्ये ठराव क्र. ५५७० मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा/अभिप्राय नमूद करण्यात आले आहे.
(I) महामंडळाने परिपत्रक दि. १०/०५/२००६ ही तारीख अर्हता दिनांक म्हणून निश्चित करण्यात यावी.
(II) अंशत: रुपांतरित अस्थायी आस्थापनेवर सामावून घ्यावयाच्या व्यक्तींच्या संख्येबाबत तसेच अटी व शर्तींबाबत योग्य त्या सुधारणा करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांना देण्यात यावेत.
सदर ठरावास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि.२९/०३/२०१६ रोजी झालेल्या ३६६ व्या बैठकीत मंजूरी देण्यात आलेली आहे.

तथापि, कंत्राटी, दरसूची, जॉब बेसीसवरील कार्यरत असलेल्या व्यक्तीचे कागदपत्रे / पुरावे छाननी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदर यादीतील काही व्यक्तींनी महामंडळाच्या सेवेत कायम करणेकामी विविध न्यायालयात दावे दाखल केले असल्याने तसेच मा.उच्च न्यायालयाने व मा.सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेले तसेच शासनाचे असणारे निर्बंध या सर्व बाबीची विधी ग्राह्यता पडताळणीकरिता उक्त यादी महामंडळाच्या विधी विभागाच्या अभिप्रायाकरिता पाठविलेली आहे.

---

## कर्जत (जि. रायगड) तालुक्यातील गावातून रिलायन्स आणि हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीच्या पाईपलाईन टाकल्याबाबत

**(१५) १०५२६६ (१९-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील अनेक गावातून गेल्या वर्षभरापासून रिलायन्स आणि हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीचे पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे काम करतांना या कंपनीच्या व्यवस्थापनाने शेतकऱ्यांना घाबरविण्याकरीता पोलिस बळाचा वापर करुन शेतकऱ्यांवर गुन्हेही दाखल केले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत मौजे भेंडखळ ता.उरण जि.रायगड ते पुणे जिल्हयातील चाकण शिक्रापूर पर्यंत १६५u कि.मी. एलपीजी गॅस पाईपलाईन टाकण्याचा प्रकल्प एच.पी.सी.एल मार्फत राबविणेत येत आहे. सदरचा प्रकल्प हा केंद्र शासनाकडील पेट्रोलियम आणि खनिज पाईपलाईन (जमिनीतील वापर करण्याचा हक्क संपादन करणे) अधिनिमय १९६२u मधील तरतूदीनुसार राबविण्यात येत आहे. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसेच केंद्र शासनाच्या मान्यतेने रिलायन्स गॅस पाईपलाईन लि. राबवित असलेल्या दहेज ते नागोठणे इथेन द्रवरुप वायु वहन प्रकल्पात कर्जत तालुक्यातील निकोप, कडाव, वडवली, भातगाव वावळोली कोषाणे, सावरगाव, वांजळे, मार्केवाडी, बेंडसे, किरवली, मुद्रे. बु. हलिवली नांगुले, तिघर, भिसेगाव, येथील खाजगी जमीनीच्या वापराच्या हक्कासाठी संपादित झालेल्या जमीनीची पेट्रोलियम आणि मिनरल्स, पाईपलाईन (जमीनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा) अधिनियम १९६२ चे कलम ६ (१) नुसार जमीनीच्या वापराच्या हक्काचे संपादन

केले आहे. तसेच रिलायन्स गॅस ट्रान्सपोर्टेशन इन्फ्रास्ट्रक्चर लि. या संपादन संस्थेने काकीनाडा ते अहमदाबाद पर्यंत नैसर्गिक गॅस वहन प्रकल्पात ३० मीटर लांबीच्या पट्टयात कर्जत तालुक्यातील मौजे निकोप, मोहिली तर्फे वरेडी, अवसरे, बिरडोली कोंदीवली दहेली तर्फे वरेडी तळवाडे, पिपळोली, बु. वाकस, नसरापूर, सालवड, गणेगाव, चिचवली कडाव येथील जमीनी वापराच्या हक्काच्या संपादित केल्या असून सदर संपादन क्षेत्रात उक्त अधिनियमाचे कलम ६ (४) नुसार केंद्र शासनाने या जमीनी वापराचा हक्क रिलायन्स गॅस पाईपलाईन लि. यांना दिलेला आहे.

त्यानुषंगाने वरील नमूद गावातील संपादित जमीनीच्या १८ मीटर क्षेत्रात विषयांकित प्रकल्पाची पाईपलाईन संस्थेच्या स्तरावरुन टाकण्यात आली आहे.

पाईपलाईन टाकते वेळी काही ठिकाणी संबंधित शेतकरी व इतर यांनी विरोध केल्यामुळे तसेच कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण झालेल्या ठिकाणी खबरदारीची उपाययोजना म्हणून संपादन संस्थेच्या स्तरावरुन पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवला होता. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी शासन स्तरावरुन चौकशी करणेत आलेली नाही.

---

## नवी मुंबई एमआयडीसी क्षेत्रातील झोपडपट्ट्यांमध्ये नागरी व मुलभूत सुविधांसाठी भूखंड मिळणेबाबत

**(१६) १०५५७४ (२१-०४-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई एमआयडीसी क्षेत्रातील झोपडपट्ट्यांमधील रहिवाशांना नागरी व मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची घटनात्मक जबाबदारी नियोजन प्राधिकारी म्हणून महापालिकेची असल्याने नाममात्रदराने भूखंड हस्तांतरित करून मिळावेत याकरीता नवी मुंबई महापालिकेने एमआयडीसीकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयडीसीने २३३ भूखंडापैकी केवळ ३३ भूखंड आतापर्यंत हस्तांतरित केले असून ९३ भूखंड हस्तांतरीत करून देण्यास मंजुरी दिली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उद्योग मंत्री व विशेष कार्यकारी अधिकारी यांना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, उक्त मंजुरी दिलेले ९३ भूखंड तसेच उर्वरित भूखंड नाममात्र दराने हस्तांतर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. महामंडळाने नवी मुंबई महानगरपालिकेस आतापर्यंत एकूण ७७ भूखंड सार्वजनिक प्रयोजनाकरीता (सार्वजनिक आरोग्य केंद्र, उदयान, बागबगीचे, स्मशानभूमी, शौचालये, इ.) नाममात्र दराने वाटप केले आहे. काही भूखंडाचे वाटपाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे तर काही भूखंडाबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) महामंडळाने नवी मुंबई महानगरपालिकेस आतापर्यंत एकूण ७७ भूखंड सार्वजनिक प्रयोजनाकरीता (सार्वजनिक आरोग्य केंद्र, उदयान, बागबगीचे, स्मशानभूमी, शौचालये, इ.) नाममात्र दराने वाटप केले आहे. काही भूखंडाचे वाटपाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे तर काही भूखंडाबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

---

**राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत असलेली ३० कार्यालये, ४४१ वसतीगृहे व ८० निवासी शाळांच्या साफसफाई इ.कामांकरीता देण्यात आलेल्या कंत्राटाबाबत**

**(१७) १०५५९६ (२३-०४-२०१८). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), अ‍ॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बसवराज पाटील (औसा), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत असलेली ३० कार्यालये, ४४१ वसतीगृहे व ८० निवासी शाळांच्या साफसफाई इ. कामांकरीता तीन वर्षासाठी ३४० कोटी रुपयांचे कंत्राट बी.व्ही.जी., क्रीस्टल व ब्रिक्स या तीन कंपन्यांना देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तीन कंपन्यांना कंत्राट देताना राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये किती कंपन्यांनी सहभाग घेतला होता, तसेच या तीन कंपन्यांशी झालेल्या करारानुसार या तीन कंपन्यांकडे सोपविण्यात आलेली कामे कोणती व त्याकरीता त्यांना किती रक्कम अदा करण्यात आली आहे,

(३) असल्यास, मराठवाडयातील लातूर, नांदेड इ. जिल्हयात मुला-मुलींच्या शासकीय वसतीगृहांना निकृष्ट भोजन पुरवठा केल्याप्रकरणी मे.हिंदुजा इंटरनॅशनल प्रा.लि.मुंबई या कंपनीला काळया यादीत टाकण्याचा प्रस्ताव सामाजिक न्याय विभागाच्या प्रादेशिक उपायुक्तांनी आयुक्तांकडे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१७ मध्ये पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (३) नुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने हिंदुजा इंटरनॅशनल प्रा.लि.मुंबई या कंपनी विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वसतीगृहे, निवासी शाळा व शासकीय इमारतींच्या साफसफाई व अन्य कामे बाहयस्त्रोताव्दारे करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार या कामासाठी न्युनतम दर प्राप्त निविदाधारकास सदर काम देण्याचा प्रस्ताव आयुक्त, समाजकल्याण,पुणे यांनी शासनास सादर केलेला आहे. परंतु त्यावर अदयाप अंतिम निर्णय झालेला नाही.
(२) या निविदा प्रक्रीयेत एकुण चार निविदाधारकांनी सहभाग घेतला होता.
तथापि याबाबत अदयाप शासनाचा नर्णिय झालेला नसल्याने करार करणे, कामे सोपविणे वा रक्कम अदा करणे अशी कार्यवाही झालेली नाही.
(३) होय
(४) मे.हिंदुजा इंटरनॅशल प्रा.ली.मुंबई या कंपनीने भोजन पुरवठयासंदर्भात करारातील अटी व शर्तीचे पालन न केल्याबाबत या कंपनीवर कारवाई करण्याचा प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, लातूर यांनी सादर केलेला प्रस्ताव आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचेमार्फत शासनास प्राप्त झालेला असून, त्यावर निर्णय घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## देऊळगावराजा (जि. बुलढाणा) तालुक्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतीगृहातील गैरव्यवहाराबाबत

**(१८) १०६५८८ (२३-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देऊळगावराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृहात जाऊन तपासणी करण्यात आली असल्याचे दर्शवून गृहपालाकडून एक लाख रुपयांची मागणी केल्याप्रकरणी दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) वसतीगृहाच्या गृहपालांनी श्री.अमरदिप देशमुख व श्री.सागर मंडळकर या खाजगी व्यक्तींविरूध्द देऊळगांवराजा पोलिस स्टेशन येथे दि.१४.१२.२०१७ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

पोलीसांनी या गुन्हयाचा तपास पुर्ण केलेला असून, आरोपीविरूध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयाला लागलेल्या आगीबाबत

**(१९) १०६७५२ (१७-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयाला दिनांक २५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश मा.उदयोग मंत्री यांनी दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले आहे व त्यानुषंगाने या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

तथापि, सदर घटनेची तक्रार राजापेठ पोलीस स्टेशन येथे करण्यात आली आहे

(४) व (५) कार्यकारी अभियंता, मऔवि महामंडळ, अमरावती यांचे अहवालानुसार कार्यालयातील अंतर्गत वायरिंग, संगणक, झेरॉक्स मशीन, फर्निचर व अंतर्गत सजावटीचे एकूण रुपये २६.७५ लक्ष नुकसान झाले आहे. तसेच कार्यालयातील अर्धवट जळालेल्या नस्त्यापैकी २३५ नस्त्याचे स्कॅनिंग करण्यात आले असून जळालेल्या नस्त्याचे शिघ्रतेने पुनर्बांधणीचे काम सुरु आहे. नस्तीची पुनर्बाधणी करताना महामंडळाच्या संबंधित कार्यालयात जसे कार्यकारी अभियंता, उप अभियंता, क्षेत्र व्यवस्थापक यांचेकडे उपलब्ध असलेले तसेच संगणक प्रणालीत उपलब्ध असलेले दस्तऐवज प्राप्त करणेत येत आहेत. उद्योजकाच्या नियमित कामात यामुळे विलंब किंवा व्यत्यय येणार नाही याची पुरेपूर काळजी घेण्यात येत आहे सदर घटनेबाबत पोलीस विभाग, अग्निशमन विभाग, विद्युत निरीक्षक व फोरेसिंक विभागाकडून अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

---

**सांगली जिल्ह्यातील आटपाडी एमआयडीसीला मंजुरी देण्याबाबत**

**(२०) १०९३१० (१७-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील आटपाडी एमआयडीसीला मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विचाराधीन प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-११-२०१८) :** (१) यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी एमआयडीसी होणेबाबत मागणी केली आहे.

(२) सदर क्षेत्राकरिता शाश्वत पाण्याचा स्त्रोत्र उपलब्ध नसल्याने तसेच पाणी पुरवठा यावर होणारा खर्च किफायतशीर नसल्याने औद्योगिक क्षेत्र स्थापन न करण्याबाबत महामंडळाने निर्णय घेतला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(२१) १०९३९२ (२३-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)u डोंबिवली (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली असून सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांनी मा.उद्योगमंत्री तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता यांचेकडे

दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-१२-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

दि. १६/०१/२०१७ चे पत्र प्राप्त झालेले नाही. तथापि, स्थानिक नगरसेविका सौ. पुष्पा म्हात्रे यांनी त्यांचे दि.१५/११/२०१६ रोजीच्या तक्रार अर्जाद्वारे डोंबिवली एमआयडीसीतील रस्त्यांवर मोठया प्रमाणात पडलेले खड्डे व रस्त्यांची झालेली दुरावस्था याबाबत मा.उद्योगमंत्री तसेच कार्यकारी अभियंता, एमआयडीसी डोंबिवली यांच्याकडे तक्रार केली होती.

(२) दुरुस्तीसाठी सन १९८७ मध्ये डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील रस्ते कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आले व त्यानंतर रस्त्यांची देखभाल दुरुस्ती कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे करण्यात येत होती. नगर विकास विभाग शासन निर्णय दि.१२ जुलै २००२ अनुसार डोंबिवली औद्योगिक क्षेत्र परिसरातील २७ गावे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातून वगळण्यात आली व सदर रस्ते ग्रामपंचायती मध्ये समाविष्ठ झाले. सन २००२ पासून ग्रामपंचायती तर्फे रस्त्यांची दुरुस्ती केली गेली नाही व महामंडळाने दुरुस्ती व मजबुतीकरण केलेले रस्ते वगळता उर्वरित रस्त्यांची दुरावस्था होत गेली.

नगर विकास विभागाच्या दि. १४ मे, २०१५ च्या शासन निर्णयान्वये १ जुलै २०१५ पासून सदर २७ गांवे पुन्हा कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रांत समाविष्ठ झाली. त्यानुसार सदर रस्त्यांची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत महामंडळाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस विनंती केली परंतु कल्याण डोंबिवली महानगरपालिके तर्फे रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली नाही.

दि.०४/१२/२०१७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम व आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्यामध्ये झालेल्या बैठकीत असा निर्णय झाला की महामंडळाने रस्त्याच्या बाजुला पक्की गटारे बांधावीत व त्यानंतरच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे रस्त्यांची दुरुस्ती करावी. त्यानुसार महामंडळाकडून रस्त्याच्या कडेला पक्की गटारे बांधण्याचा आणि पथदिवे बसविण्याचा रु.३८.५९ कोटी (नि) व रु.४४.३८ कोटी (ठोक) या प्रस्तावास दि.२८/०६/२०१८ द्वारे प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे व तांत्रिक मान्यतेची कार्यवाही सुरु असून, तांत्रिक मान्यतेनंतर सदर कामाच्या निविदा काढण्यात येतील. सबब, याबाबत चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) लागू नाही.

---

### महाड (जि.रायगड) तालुक्यातील पंचतारांकित औद्योगिक वसाहतीतील भूखंडाबाबत

**(२२) १०९८२९ (१९-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील पंचतारांकित औद्योगिक वसाहतीतील ५० टक्के कंपन्या बंद असल्याने उर्वरित भूखंडावर कंपनीऐवजी केवळ शेड उभी करुन संबधित भूखंड मालकांनी जागा वाचविण्याची नवी शक्कल लढविली असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (३०-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि, सदर औद्योगिक क्षेत्रातील भूखंड धारकांना मुलभूत सोईसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या नव्हत्या. त्यामुळे सदर भूखंड सन २००९ च्या रिव्हर पॉलिसीमुळे बाधित झालेले होते. त्यामुळे सदर भूखंडधारकांना विहित मुदतीत विकास करणे शक्य झाले नव्हते. तद्नंतर, River Policyu चे बंधन रद्द झाल्यामुळे बाधीत भूखंडधारकांना दि. २/२/२०१९ पर्यंत भूखंड विकासाचा सुधारीत कालावधी देण्यात आलेला आहे. तसेच ज्या भूखंडधारकांना सोईसुविधा उपलब्ध नव्हत्या. त्यांना माहे मार्च २०१९ पर्यंत भूखंड विकासाचा कालावधी मंजूर केलेला आहे. तसेच वाटपास उपलब्ध असलेले भूखंड LAC द्वारे व E- Biddingu द्वारे नव्याने वाटप करण्यात आलेले आहे. अशा ८५ भूखंडधारकांचा भूखंड विकास कालावधी शिल्लक आहे. वाटपाचा महामंडळाच्या धोरणानुसार जे भूखंडधारक विहित मुदतीत वा वाढीव मुदतीत बांधकाम करून बी.सी.सी प्राप्त करीत नाहीत अशा भूखंडधारकांना धोरणानुसार नोटीस देऊन भूखंड काढून घेण्याची कार्यवाही नियमितपणे करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## म्हातवली (ता.उरण, जि.रायगड) ग्रामपंचायतीतील पाणी पुरवठ्याबाबत

**(२३) १०९८८१ (२३-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हातवली (ता.उरण, जि.रायगड) या ग्रामपंचायतीमध्ये काही ग्रामस्थ प्रतिमाह पाणीपट्टी भरत असतांना देखील काही थकबाकीदारांमुळे एमआयडीसी पाणी पुरवठा खंडीत करणार असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (३०-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) महामंडळाची पाणी पट्टीची थकबाकी असलेल्या सर्व ग्रामपंचायतीना पाठविण्यात आलेल्या नोटीसांप्रमाणे म्हातवली ग्राम-पंचायतीला सुध्दा थकीत पाणीपट्टी अदा करणेबाबत दिनांक ०८/१२/२०१७ रोजी नोटीस देण्यात आली होती. त्यामध्ये दिनांक २९/१२/२०१७ पर्यंत थकबाकी अदा करणेची नोटीस देऊन थकबाकी अदा न केल्यास दिनांक ०१/०१/२०१८ पासून पाणी पुरवठा मर्यादित कालावधीकरिता (सकाळी ६ ते १०) करण्यात येईल असे नमूद केले होते. तथापि सदरील ग्रामपंचायतीच्या पाणी पुरवठयामध्ये अद्याप पाणी कपात करण्यात आलेली नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील पालेगाव व पणसीफाडा गावांना जादा पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(२४) ११०५६५ (२३-०४-२०१८). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालेगाव (ता.अंबरनाथ, ता.ठाणे) येथील नवीन औद्योगिक क्षेत्र सुरु करण्यासाठी महामंडळाने अनेक भूखंड संपादित केले असून पालेगावला एमआयडीसीकडून पाणी पुरवठा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीन संपादित करतांना तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पालेगांव व फणसीपाडा या गावांना एमआयडीसीमार्फत जादा पाणी पुरवठा करण्याचे आश्वासन देऊनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याने अंबरनाथ शहरातील बारवी धरणातून जादा पाणी पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.उद्योगमंत्री यांच्याकडे पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (३०-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) बारवी धरणात सध्या सांडव्या पर्यंत २३६ द.ल.घ.मी. साठा असला तरी महामंडळाला उल्हासनदीतून फक्त ५८३ द.ल.लि. प्रतिदिन १०टक्के जादा पाणी उचलण्याची मर्यादा होती. त्यामुळे मुंबई प्राधिकरणाच्या ग्राहकांना पाण्याची टंचाई उद्भवली होती. त्यानुषंगाने शासन स्तरावर दिनांक २७/१२/२०१६ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीत महामंडळाने ७७० द.ल.लि. पाणी बारवी व शहाड पाणी पुरवठा योजनेमधून उचलावे असा निर्णय घेण्यात आला. सदर ७७० द.ल.लि. पाणी कोटयामध्ये कल्याण डोंबिवली नगरपालिका क्षेत्रातील २७ गावे व मिरा भाईंदर महानगरपालिका यांना वाढीव पाणी पुरवठा करण्याचे आदेश असल्याने पालेगाव व फणसीपाडा (ता.अंबरनाथ) या गावांना जादा पाणी पुरवठा करणे शक्य झालेले नाही. त्यामुळे वाढीव पाणीपुरवठा मागणी विचारात घेता आली नाही. धरणाची उंची वाढवून पुनर्वसनाची कामे झाल्यानंतर साठवण क्षमता ३४० द.ल.घ.मी. होणार असल्याने वाढीव पाणी वाटपाबाबत शासन स्तरावर बैठक झाली असून वाढीव पाणी पुरवठा बाबत महामंडळाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) क्षेत्रात होत असलेल्या पाणी चोरीबाबत**

**(२५) ११०९२८ (२०-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली सह एमआयडीसीने मंजूर पाणी कोटयापेक्षा दिवसाला एकूण ६५ टक्के पाणी चोरी केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (३०-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) पाटबंधारे विभागाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास करारनाम्यानुसार एकूण ५८३ द.ल.लि. प्रतिदिन पाणी आरक्षण मंजुर केलेले आहे. या आरक्षणा व्यतिरिक्त १०% मर्यादेपर्यंत पाणी उचलता येते. परंतु सन २०१६ मध्ये विशेषत: कल्याण डोंबिवली महापालिकेमधील २७ गावे, मीरा भाईंदर व विविध महानगरपालिकामध्ये पाणी पुरवठयाच्या अभावी तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्यामुळे यावर तातडीने उपायोजना करण्यासाठी मा.उद्योग मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७/१२/२०१६ रोजी तात्काळ संयुक्तीक बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये महामंडळाने ७७० द.ल.लि प्रतिदिन पाणी बारवी आणि शहाड मधून उचलावे असा निर्णय करण्यात आला होता व वाढीव पाणीपुरवठा आरक्षण मंजुर करण्यासाठी त्वरीत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. या परवानगीनुसार जलसंपदा विभागास महामंडळातर्फे ७७० द. ल.लि. प्रतिदिन पाणी उचल सुरु केल्याने महामंडळाने दि. २८/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आले आहे. उचल करीत असलेल्या पाण्याचे देयक पाटंबधारे विभागास नियमितपणे भरणा करण्यात येत आहे. त्यामुळे महामंडळ पाण्याची चोरी करीत आहे हे म्हणणे संयुक्तीक नाही. महामंडळाने जानेवारी, २०१८ मध्ये बारवी पाणी पुरवठा केंद्र व शहाड पाणी पुरवठा केंद्रामधून एकूण ७५२.२१ द.ल.लि. प्रतिदिन पाणी उचल केले असून सदर पाणी देयक पाटंबधारे विभागास अदा करण्यात आले आहे.

---

## देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) तालुक्यात मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह सुरु करण्याबाबत

**(२६) १११९७८ (२३-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) तालुक्यात मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह सुरु करण्याबाबत मा.आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी शासनास प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, अहवालाच्या अनुषंगाने मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) व (२) ज्या तालुक्यामध्ये मुलींचे वसतीगृह नाही त्या तालुक्यामध्ये वसतीगृह सुरु करण्याचे आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी प्रस्तावित केले होते.

(३) नविन वसतीगृह सुरु करण्याचा निर्णय अदयाप झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोडनिंब व बाबी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील परिसरातील माळरानावर नवीन एम.आय.डी.सी. मंजूर करण्याबाबत

**(२७) ११२२१४ (२०-०४-२०१८). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोडनिंब व बाबी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील परिसरातील माळरानावर नवीन एम.आय.डी.सी. मंजूर होण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत व नागरिक यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोंडनिंब हे राष्ट्रीय महामार्गावरील गाव असून तेथे ब्रॉडगेज रेल्वे लाईन यांचेसह मुलभूत सुविधा उपलब्ध असून नवीन उद्योजक निर्माण झाल्यास बेरोजगारांना रोजगार मिळण्याबाबत मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने एम.आय.डी.सी. निर्माण होऊन बेरोजगारांना मदत मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-११-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) औद्योगिक वसाहतीसाठी सुयोग्य व संमती असलेल्या क्षेत्राची पडताळणी करणेची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मरोळ येथे येथे आदिवासीच्या हक्कांच्या जागेवर हब् टाऊन प्रकल्पाचे अनधिकृत बांधकाम सुरु असल्याबाबत.**

**(२८) ११२३४० (२१-०४-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसीने) मरोळच्या कोंदिविटा गावच्या एमआयडीसीच्या ताब्यात असलेल्या भूखंडापैकी सर्व्हे क्र.१२ आणि १४ आणि ९१ या भूखंडावर गत ६० वर्षापासून रहात असलेल्या आदिवासीची जमीन सन १९६३-६४ मध्ये विकासासाठी ताब्यात घेतली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू एमआयडीसीच्या ताब्यात असलेल्या भूखंडावर सुमारे २५० हून अधिक आदिवासीची घरे असून १ हजारापेक्षा जास्त आदिवासीची लोकवस्ती असताना तसेच मूळगाव, मरोळ हा आदिवासीच्या सुविधा भूखंड (अमोनिटी प्लॉट) राखीव असताना आदिवासींची फसवणूक करुन तसेच एमआयडीसीची परवानगी नसताना ही एमआयडीसीच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने हब् टाऊन प्रकल्पाचे अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-१२-२०१८) : (**१) होय
(२), (३) व (४) मूळगाव, मरोळ येथील सदर भूखंड सुविधा भूखंड नसून तो मोकळा भूखंड (ओपन स्पेस) असून, त्याचा क्रमांक ओएस ४ (पॉकेट क्र.६) असा आहे.

महामंडळाच्या मरोळ येथे सुमारे १२७ हेक्टर औद्योगिक क्षेत्रामध्ये सुमारे ९ मोकळया भुखंडावर झोपडयांचे अतिक्रमण झाल्याने महामंडळाच्या संचालक मंडळाने दि. २२/११/१९९३ च्या २२६ व्या सभेत ठराव क्र. २९४९ अन्वये झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविण्याचा व त्यासाठी विकासक नेमण्याचा निर्णय घेतला.

कामासाठी जागातिक निविदा (Global Tenders) मागविण्यात आल्यानंतर निविदा मंजूर करून करारनामा क्र. सी-१ सन १९९५-९६ अन्वये दि. २६/१०/१९९५ रोजी मे. आकृती निर्माण प्रा. लि. (मे. हबटाऊन) यांना कार्यादेश देण्यात आले. यामध्ये पॉकेट १ ते ९ यांचा समावेश आहे.

मरोळ औद्योगिक क्षेत्रातील मौजे कोंदिविटा ता. अंधेरी, जि.मुंबई उपनगर येथील सर्व्हे क्र. १२, १४ व ९१ मधील ओएस क्र.-४ (OS-४) हे क्षेत्र पॉकेट क्र. ०६ असून सदरहू क्षेत्र मे.आकृती निर्माण प्रा. लि. (मे. हबटाऊन) यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत वाटप करण्यात आले आहे.

विकासकास देण्यात आलेल्या पॉकेट क्र. १ ते ९ मधील पॉकेट क्र. ६ वरील महामंडळाच्या हद्दीत येणाऱ्या जागेवर विकासक मे. आकृती निर्माण प्रा. लि. यांना त्यांच्या विक्री करावयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यास महामंडळाचे पत्र क्र. सी-१३३१३ दि. १३/०६/२०१७ परवानगी देण्यात आली आहे.

तसेच पॉकेट क्र. ६ मधील १३४९.०० चौ.मी. क्षेत्र MMRDA यांना Mumbai Metro Line - ३ चे बांधकाम करण्याकरीता देण्यात आले आहे.

सदरहू पॉकेट क्र. ६ च्या जागेवरील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या मेट्रो रेल्वे टप्पा ३ च्या प्रस्तावित क्षेत्रात बाधीत होणारे झोपडीधारकांचे पुनर्वसन MMRCL यांचेमार्फत करण्यात आले आहे.

---

## मंगरूळपीर (जि.नाशिक) तालुक्यातील जिल्हापरिषद अंतर्गत मागासवर्गीय मुलींचे व मुलांचे वसतीगृह बंद करण्याबाबत

**(२९) ११३२४५ (२३-०४-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशीम जिल्हापरिषद अंतर्गत पंचायत राज समितीने मंगरूळपीर येथील मागासवर्गीय मुलींचे व मुलांच्या दोन वसतिगृहास दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास भेट दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसतिगृहास भेट दिल्यावर विद्यार्थ्यांची कमी उपस्थिती, निकृष्ट दर्जाचे जेवण, प्रचंड अस्वच्छता समितीस आढळून आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पंचायत राज समितीच्या दिनांक १९ जानेवारी, २०१८ च्या बैठकीत सदर वसतिगृह बंद करण्याची शिफारस शासनाकडे करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच वसतीगृह बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) u होय.
(२) होय.
(३) व (४) पंचायतराज समितीचे भेटीमध्ये या वसतीगृहामंध्ये आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सदर संस्थेस दि.२०.१.२०१८ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असून, शासन नर्णिय, दि.१६.३.९८ मधील तरतुदींनुसार सदर वसतीगृहे बंद करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ७८५ वसतिगृहाचे अनुदान थांबविल्याबाबत

**(३०) ११३६४० (२३-०४-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात २ हजार ३८८ अनुदानित वसतिगृहांपैकी ७८५ वसतिगृहांकडे मूळ मान्यता आदेश नसल्याचे कारण दाखवून समाजकल्याण आयुक्तांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या आदेशानुसार त्यांचे अनुदान थांबविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मूळ मान्यता असलेल्या वसतिगृहांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) शासनाची मान्यता नसतांनाही काही ठिकाणी अनुदानित वसतीगृह चालविण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे राज्यातील मुळ मान्याता आदेश नसलेल्या अनुदानित वसतीगृहांची तपासणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. सदर तपासणी होईपर्यंत या वसतीगृहांचे अनुदान थांबविण्यात आले होते.
(२) होय,

मुळ मान्यता आदेश नसलेल्या वसतीगृहांची राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीकडून तपासणी करण्यात आलेली आहे.
(३) मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे अध्यक्षते खालील समितीच्या तपासणीमध्ये पात्र आढळून आलेल्या वसतीगृहांच्या अनुदानासंदर्भात आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे स्तरावर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**रत्नागिरी जिल्हयातील औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचे वाटपातील अनियमितता व आढळून आलेल्या त्रुटीबाबत**

**(३१) ११४१९७ (२३-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साडवली, गाणे खडपोली, लोटे, परशुराम, खेर्डी, चिपळूण (जि.रत्नागिरी) या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचे वाटपात अनियमितता व त्रुटी आढळून आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (३०-११-२०१८) :** (१) व (२) या प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून श्री.पी.एस.पाटील, तत्कालीन प्रादेशिक अधिकारी रत्नागिरी हे सदर प्रकरणात दोषी दिसून आल्याने त्यांना महसूल व वन विभागाच्या दि.१६/५/२०१८ रोजीच्या आदेशान्वये शासन सेवेतून पुढील आदेशापर्यंत निलंबित केलेले आहे व त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्यासाठी प्रस्ताव महसूल व वन विभागास सादर करण्यात आला आहे. तसेच संचालक मंडळाच्या दिनांक ०२/०४/२०१८ रोजीच्या ३७४ व्या बैठकीमध्ये औद्योगिक क्षेत्र निहाय भूखंड वाटप केलेल्या प्रकरणांची गुणवत्तेवर छाननी करुन त्यांना पात्र/अपात्र ठरविण्यात आले असून त्यापैकी एकूण १४८ अर्जदारांना पात्र करण्यात आलले आहे. त्यापैकी ७ अर्जदारांनी मा.न्यायालयात दावे दाखल केलेले असून सदर अर्जदारांना मा.न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून पात्र ठरविण्यात आले आहे. एकूण १७ अर्जदार अपात्र ठरविण्यात आले व १२ अर्जदारांनी अर्ज मागे घेतलेले असून त्यानुषंगाने संचालक मंडळाचा पारित ठराव क्रमांक ५७५५ अन्वये मंजुरी दिलेली आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाचे विभागीय कार्यालय सोलापूर जिल्हयात सुरु करण्याबाबत**

**(३२) ११४३९० (२१-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाचे विभागीय कार्यालय सांगली येथे असल्यामुळे सोलापूर जिल्हयातील उदयोजकांना अनेक विविध प्रकारच्या कामासाठी सांगली येथील कार्यालयात जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उपविभागीय कार्यालय होण्याबाबतची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार सोलापूर येथे एमआयडीचे उपविभागीय कार्यालय सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-११-२०१८) :** (१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे विभागीय कार्यालय सांगली येथे आहे, हे खरे आहे.

सोलापूर येथे दि.०१/०७/१९७७ पासून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उप विभागीय कार्यालय कार्यान्वित आहे. तेथे उद्योजकांच्या कामकाजासाठी ऑनलाईन प्रक्रियेद्वारे कामे सुरु असल्याने उद्योजकांना विभागीय कार्यालय सांगली येथे जाण्याची आवश्यकता भासत नाही. उद्योजकांचे अभियांत्रिकी स्वरुपाचे कामकाज सद्य:स्थितीत सोलापूर उपविभागीय कार्यालयातून होतात.
(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत सोलापूर येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उपविभागीय कार्यालय कार्यरत आहे.
(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सोलापूर येथील उपविभागीय कार्यालय दि.०१/०७/१९७७ पासुन कार्यरत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला महाराष्ट्र औद्योगिक विकास वसाहतीमधील भूधारकांना मोबदला देण्याबाबत**

**(३३) ११४४९९ (२३-०४-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला महाराष्ट्र औद्योगिक विकास वसाहतीमधील भूधारकांना मोबदला देण्यासाठी अकोला विकास केंद्राकडून दिनांक १६ डिसेंबर २०१७ रोजीच्या पत्रान्वये महाव्यवस्थापक (भूसंपादन), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्राप्त झालेले धनादेश विधी सल्लागाराने विद्यमान दिवाणी न्यायालयात वेळेपूर्वी सादर केले नसल्यामुळे नाहक विलंब शुल्क वाढला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-१२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

जून २०१८ मध्ये ४ न्यायालयीन प्रकरणांत मागणीनुसारची रक्कम उपलब्ध करुन देण्यात आली असून एका न्यायालयीन प्रकरणात रक्कम उपलब्ध करुन देणेची कार्यवाही मुख्यालयीन स्तरावरुन सुरु आहे.

(२) होय. हे खरे आहे.

जून २०१६ मध्ये उपलब्ध करुन दिलेल्या धनाकर्षाचा विधी सल्लागाराने विद्यमान दिवाणी न्यायालयात भरणा नाही केला.

(३) सदर विधी सल्लागाराला महामंडळाच्या पॅनलवरुन कमी करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयातील प्रादेशिक अधिकारी पद भरण्याबाबत**

**(३४) ११४८९२ (२१-०४-२०१८). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयातील प्रादेशिक अधिकारी हे पद माहे ऑगस्ट २०१७ पासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पद रिक्त असल्यामुळे लातूर व उस्मानाबाद या दोन्ही जिल्ह्यातील उद्योजक तसेच नव उद्योजकांची अनेक कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात मोठ्या प्रमाणावर औदयोगिक विकासाच्या (स्टार्ट अप व स्टँड अप) उभारणी तसेच सुरुवातीसाठी शासनाच्या योजना राबविल्या जात असताना प्रादेशिक अधिकारी हे पद रिक्त असल्याने या भागातील नागरिकांना या योजनांचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पद भरण्याबाबत तसेच लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरिकांना योजनांचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-११-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

दि.३१/०८/२०१७ पासून सदर पद रिक्त होते. मात्र, सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद यांचेकडे सोपविण्यात आला होता.

(३) हे खरे नाही.

(४) दि.२२/०५/२०१८ च्या आदेशान्वये श्री.महेशकुमार मेघमाळे यांची प्रादेशिक अधिकारी, लातूर या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर धेरंड (ता.अलिबाग, जि.रायगड) या गावाच्या हद्दीत समुद्राचे पाणी शिरल्याने शेतीचे झालेले नुकसान**

**(३५) ११५०५६ (१९-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर धेरंड (ता.अलिबाग, जि.रायगड) या गावाच्या हद्दीतील जमिनी एमआयडीसीने संपादित केल्या असून सदर ठिकाणी कोणताही प्रकल्प उभा करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीच्या खारभूमी बंधाऱ्याची निगा राखली नसल्याने समुद्राचे खारे पाणी भातशेतीमध्ये शिरून शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याने, भातशेतीची नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी एमआयडीसीकडे केली आहे. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना भातशेतीची नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (३०-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मौजे शहापूर व धेरंड या गावातील ३८७.७५ हे. आर खाजगी जमीन संपादित करुन मे. टाटा पॉवर कंपनी लि. यांना त्यांच्या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रासाठी दिनांक २४/११/२००४ रोजी सुपूर्द केलेला आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि, भूसंपादित क्षेत्र हे खाडीलगत असल्याने भरती ओहोटीच्या वेळी आजुबाजुच्या गाव/शेती या परिसरात भरतीचे पाणी येत असल्याने ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार मे. टाटा, पॉवर व खारभूमि विकास विभाग अलिबाग यांचेमार्फत संयुक्त पाहणी करुन ग्रामस्थांनी दर्शविलेल्या विविध ठिकाणी गाव सुरक्षा/शेती सुरक्षा करणे कामी बांधदुरुस्ती, लाकडी दरवाजे बसविणे, दगडी भराव करणे इ.कामे कंपनीकडून डिपॉझिट कॉन्ट्रीब्युशन घेऊन कार्यकारी अभियंता खारभूमि विकास उपविभाग अलिबाग यांचेमार्फत करण्यात आलेली आहेत.

---

**डॉ.बाबासाहेब आंबडेकर स्वाधार योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(३६) ११५९४० (०४-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबडेकर स्वाधार योजना सुरु करण्यात आली असल्याचे माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाज कल्याण विभागाच्या वसतिगृहात प्रवेश मिळू न शकलेले गुणवंत विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये व इतर सुविधांचा लाभ मिळावा यासाठी सदर योजना सुरु केली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१६-१७ मध्ये १५ हजार विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते, मात्र राज्यातील केवळ ३ हजार २५५ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना त्वरित मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) : (**१) शासकीय वसतीगृहांत प्रवेश न मिळालेल्या वा पुढील शिक्षणासाठी निवास, भोजन वा अन्य सुविधा उपलब्ध होऊ न शकणाऱ्या अनुसूचित जाती व नबबौध्द प्रवर्गातील विदयार्थ्यांना या सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी शासन निर्णय दि.०६.०१.२०१७ अन्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केलेली असून, या योजनेचा लाभ जास्तीत जास्त विदयार्थ्यांना मिळावा म्हणून या योजनेमध्ये दि.०३.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये काही बदल करण्यात आलेले आहेत.
(२) होय.
(३) सदर योजना नविन असल्यामुळे व सन २०१६-१७ हे अर्थिक वर्ष अर्धेअधिक पूर्ण झाल्यानंतर योजना जाहिर झाल्यामुळे त्या वर्षाचे उद्दिष्ट पूर्ण करता आले नाही .
(४) या योजनेचा लाभ जास्तीत जास्त विदयार्थ्यांना मिळावा म्हणून या योजनेमध्ये दि.०३.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये काही बदल करण्यात आलेले असून, योजनेची माहिती महाविदयालय स्तरापर्यंत देण्यात येऊन विदयार्थ्यांकडून या योजनेचे अर्जही भरुन घेण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील अंधेरी (पश्चिम) येथील मरोळ औद्योगिक वसाहतीमधील x -२३ भूखंड निविदा न काढताच वाटप केल्याबाबत

**(३७) ११६५४० (२३-०४-२०१८). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अंधेरी (पूर्व) मरोळ औद्योगिक वसाहतीमधील x -२३ हा भूखंड निविदा न काढताच मे.नवनीत मोटर्स यांना वाटप करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडाच्या शेजारील x-२२ हा भूखंड प्रती चौरस मीटर १ लाख ५६ हजार या दराने M/S. GHV Hospitality Pvt. Ltd.u यांना वाटप केला तर x-२३ हा भूखंड प्रती चौरस मीटर ५४ हजार इतक्या कमी दराने वाटप करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणाची अंमलबजावणी न करता x-२३ या भूखंडाच्या वाटपामध्ये गैरव्यवहार झाला असल्याने महामंडळाला तोटा झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर x -२३ या भूखंडाचे वाटप रद्द करून पुन्हा निविदा काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-१२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) मरोळ औद्योगिक वसाहतीलमधील एक्स-२३ क्षेत्र २६०७.४५ चौ. मी. चे क्षेत्र वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा पध्दतीने उच्चतम दर असलेल्या रुपये ५६६६६/- प्रति चौ.मी. मे.नवनित मोटर्स प्रा. लि. यांना वाटप आदेश दिनांक २०/०५/२०१६ अन्वये वाटप करण्यात आला होता. तथापि, मे. नवनीत मोटर्स प्रा.लि. यांनी मागणी केल्यानुसार सदर भूखंडालगतचे असलेले अतिरिक्त क्षेत्र ५५७.३१ चौ. मी. असे एकूण ३१६४.७६ चौ.मी. इतके क्षेत्र निविदेतील दरानुसार व महामंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे.

एक्स-२२ हा भूखंड व्यापारी दराने भूखंड वाटप केला आहे. तसेच एक्स-२३ हा भूखंड औद्योगिक दराने वाटप करण्यात आला आहे. महामंडळाचे व्यापारी व औद्यौगिक दर वेगवेगळे आहेत.

---

## भिवंडी ग्रामीण (जि.ठाणे) तालुक्यासाठी स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा व प्रशिक्षित अधिकारी /कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३८) ११८०६० (२३-०७-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी ग्रामीण (जि.ठाणे) तालुक्यासाठी स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा, प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्याबाबत मा.उद्योग मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-१२-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

मा. लोकप्रतिनिधी यांचे दिनांक २१/११/२०१७ चे पत्र शासनास दिनांक ०८/०१/२०१८ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) व (३) भिवंडी येथे महापालिका अस्तित्वात असून त्यांच्यामार्फत भिवंडी शहरासाठी व आजुबाजूच्या गावांसाठी अग्निशमन सेवा पुरवली जाते. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत तेथे कुठल्याही प्रकारचे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आलेले नाही. त्यामुळे भिवंडी या तालुक्यासाठी महामंडळामार्फत अग्निशमन यंत्रणा उभारणे व ती राबविणे शक्य नाही.

---

**वरळी (मुंबई) येथील वसतीगृहात विद्यार्थिनीने केलेली आत्महत्या**

**(३९) ११८१०८ (०२-०८-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेंट झेविअर्स मध्ये अभियांत्रिकी अभ्यासक्रम शिकत असलेली कु.शितल शरद शिर्के या मुलीने मुंबईतील वरळी येथील सामाजिक न्याय विभाग संचालित वसतीगृहात दिनांक ३ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास गळफास लावून आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) होय

(२) व (३) या प्रकरणी वरळी पोलीस स्टेशन येथे फीर्याद देण्यात आलेली असून, पोलीस विभागाचा तपास अदयाप पुर्ण झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय वसतीगृहामध्ये रात्रीच्या वेळी संरक्षणासाठी असलेल्या पहारेकऱ्याच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(४०) ११८६२० (२३-०७-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वसतीगृहामध्ये रात्रीच्या वेळी संरक्षणासाठी असलेल्या पहारेकऱ्यास दरमहा फक्त रु.४,०००/- इतके तुटपुंजे मानधन मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मानधनामध्ये वाढ करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मानधनामध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) नाही.

शासकीय वसतीगृहाच्या पहारेकऱ्यांचे काम बाहयस्त्रोव्दारे खाजगी कंपनीकडून करुन घेण्यात येत असल्याने मानधनाचा प्रश्न येत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही..

---

**राज्यातील अनुदानित आश्रमशाळांच्या अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत**

**(४१) ११८६२२ (२३-०७-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित आश्रमशाळांना शाळा खर्चासाठी, विद्यार्थ्यांच्या गणवेश, लेखन साहित्यासाठी शासन चौथ्या वेतन आयोगाप्रमाणे होणाऱ्या वेतनावर ८ टक्के प्राथमिक विभाग आणि १२ टक्के माध्यमिक विभागास अनुदान देते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अनुदान एकूण होणाऱ्या खर्चाच्या १० टक्के असून ते अत्यंत तुटपुंजे असल्याने या अनुदानामध्ये वाढ करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी अनुदानित आश्रमशाळांच्या अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) नाही.

अनुसूचित जातीच्या माध्यामिक व प्राथमिक आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाने प्रमाणे वेतन देण्यात येते. तर या आश्रमशाळांना १५ टक्के वेतनेतर अनुदान देण्यात येते.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माजलगांव (जि.बीड) तालुक्यातील एमआयडीसीमध्ये टेक्सटाईल पार्क उभारण्याबाबत**

**(४२) ११८६४४ (२३-०७-२०१८). श्री.आर. टी. देशमुख (माजलगांव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माजलगांव (जि.बीड) तालुक्यातील एमआयडीसीमध्ये टेक्सटाईल पार्कला शासनाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी टेक्सटाईल पार्क उभारण्याबाबत तसेच रेखांकन नकाशा मंजुर करुन प्लाट वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) माजलगाव औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित एकूण १६८.८९ हे.आर क्षेत्रापैकी टेक्सटाईल पार्क (Textil Park) साठी १०० हेक्टर क्षेत्र आरक्षित करुन १०० भूखंडाचा आराखडा मंजूर केला आहे. आरेखित भूखंडांना सेवा पुरविण्यात आल्या असून, ७ भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह व निवासी शाळेतील विद्यार्थ्यांच्या सोयी-सुविधांबाबत**

**(४३) ११९६३२ (०२-०८-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतीगृह व निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना पुरेशा सोयी-सुविधा मिळत नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने या वसतीगृहातील व निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) लोणार जि.बुलढाणा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय शासकीय वसतिगृह तसेच व शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना पुरेशा सोयी-सुविधा मिळत नसल्याची तक्रार स्थानिक लोक प्रतिनीधींनी दि.२६.२.२०१८ अन्वये केली होती.

(२) व (३) सदर तक्रारींचे अनुषंगाने सहायक आयुक्त, समाजकल्याण, बुलढाणा यांनी या वसतीगृह/निवासी शाळेस भेट देऊन संबंधीतांना आवश्यक सुचना दिलेल्या असून, विदयार्थ्यांना नियमांनुसार सर्व सोयी-सुविधा योग्य प्रकारे पुरविण्यता येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तासगांव-कवठेमहांकाळ (जि.सांगली) तालुक्यासाठी एमआयडीसी सुरु करण्याबाबत**

**(४४) १२१०१० (२३-०७-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव-कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासगांव-कवठेमहांकाळ (जि.सांगली) तालुक्यासाठी एमआयडीसी सुरु करुन तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उद्योग मंत्री तसेच जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे गत दोन वर्षापासून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दोन वर्षाचा कालावधी उलटून देखील शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर ठिकाणी एमआयडीसी सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सद्य:स्थितीत कवठे-महांकाळ तालुका येथे महामंडळाचे १२.८० हे.आर औद्योगिक क्षेत्र असून त्या ठिकाणी औद्योगिक ४३, व्यापारी ६ व सुविधा ४ भूखंड विकसीत केले असून, औद्योगिक ३९, व्यापारी २ व सुविधा १ भूखंड वाटप केले आहे. औद्योगिक ४, व्यापारी ४ व सुविधा ३ भूखंड वाटपास उपलब्ध आहेत.

तासगांव तालुक्यात मौजे अलकूड-मणेराजूरी येथील खाजगी १२९८.६७ हे. आर व सरकारी २००.६२ हे.आर अशी एकूण १४९९.२९ हे.आर क्षेत्र प्रकरण ६ नुसार दि.३/०६/१९९९, २१/०९/२०००, ५/०९/२००२, २६/०९/२००७ ला अधिसूचित झाले आहे. त्यापैकी १४४.९७ हे.आर क्षेत्रास दि.२७/११/२००० व ७४.३० हे.आर क्षेत्रास दि.१०/०६/२००२ ला कलम ३२ (१) ची अधिसूचना लागू झाली आहे. ताबा प्राप्त सरकारी १०१.३२ हे.आर क्षेत्राची पाहणी केली असून, सरकारी क्षेत्राव्यतिरिक्त खाजगी क्षेत्र संपादनाबाबत कार्यवाही सुरु आहे.

तासगाव तालुक्यात मौजे गव्हाण येथील ४६.०२ हे.आर सरकारी जागेची पाहणी भू-निवड समितीने दि.१४/०६/२०१८ रोजी केली असून, भूसंपादनाची पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळातील प्रमुख अधिकारी पद भरण्याबाबत

**(४५) १२११२६ (२३-०७-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळातील प्रमुख अधिकारी (आरओ) पद गत अनेक महिन्यांपासून मा.उदयोग मंत्री यांचेकडे पाठपुरावा करुन देखील रिक्त असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पद रिक्त असल्याने उद्योजकांना त्यांच्या विविध समस्यांसाठी वारंवार नागपूर येथे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रिक्त पद तातडीने भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (३०-११-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

प्रादेशिक अधिकारी, अमरावती या पदाचा अतिरिक्त कार्यभार प्रादेशिक अधिकारी, नागपूर यांचेऐवजी अन्य अधिकाऱ्याकडे देण्यात आलेला आहे. तसेच प्रादेशिक अधिकारी, अमरावती या पदावर उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्याची त्वरीत नियुक्ती करण्याची विनंती महसूल व वन विभागास करण्यात आली आहे.

---

**पालघर जिल्ह्यातील औद्योगिक विकास महामंडळाच्या कंपन्या बंद करण्याबाबत**

**(४६) १२३३०४ (०२-०८-२०१८). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक विकास महामंडळामध्ये सालवड ग्रामपंचायतीला लागून रेड कॅटेगरीजच्या कारखान्याना परवानग्या देण्यात आल्या असून, या कंपनीमध्ये ग्रा.प. सालवडच्या २० मिटर अंतरावर सेया इंडस्ट्रिड लि.प्लॉट नं डी-१६ मध्ये रेड कॅटेगरीजच्या कंपनीला परवानगी दिली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपनी सल्फुरिक ॲसिडचे उत्पादन करत असल्याने सदर उत्पादनाला सालवड व हददीतील ग्रामस्थांचा तीव्र विरोध असून सदर उत्पादनामुळे स्थानिक भूमिपुत्राचे जीवन धोक्यात आले असल्याने सदर कंपनीस दिलेल्या परवानग्या रद्द करण्यात येऊन दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास कंपनीच्या गेटसमोर मोर्चा काढण्यात आला होता, हे ही खरे आह काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कंपन्या तातडीने कायमस्वरुपी बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१४-११-२०१८) :** (१) तारापूर औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक डी-१६ हा दिनांक ०१/०३/२०१२ च्या हस्तांतर आदेशान्वये मे. सेया इंडस्ट्रीज लि. या कंपनीच्या नावे Nitro Automatic and Dye Intermediatesu या प्रयोजनाकरिता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची संमतीप्राप्त करण्याच्या अटीस अधीन राहून हस्तांतरण करण्यात आले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) तारापूर औद्योगिक क्षेत्रातील मोकळे भूखंड आणि बंद भूखंडाबाबत प्राप्त केलेल्या अहवालानुसार भूखंड क्रमांक डी-१६ मोकळा असून उत्पादन बंद असल्याने दि.१५/०६/२०१५ आणि दि. ०६/०७/२०१५ रोजी Termination of lease Agreement ची नोटीस बजावणी

करुन दि. २१/०७/२०१७ रोजी भूखंडाचा ताबा महामंडळास परत करणेबाबत कळविण्यात आले आहे. सदरहू नोटीसच्या अनुषंगाने भूखंडधारका यासंनी महामंडळाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे W.P.१८४५ /२०१५ अन्वये दाखल केला. सदर दाव्यात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी महामंडळास तारापूर औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचा ताबा घेणेस प्रतिबंध केला. सदर भूखंडावर बांधकाम सुरु असून अद्याप उत्पादनास सुरुवात केलेली नाही.

---

## राज्यातील शासकीय वसतीगृहांच्या अनुदानाबाबत

**(४७) १२३८६६ (०२-०८-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वसतीगृहांना प्रति विद्यार्थी दरमहा ४३०० रुपये, तर अनुदानित वसतीगृहांना अवघे ९०० रुपये भोजन अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाप्रकारे भोजन अनुदानात दुजाभाव करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, वसतीगृहातील विद्यार्थ्यांना सारखेच भोजन अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) अनुदानित वसतीगृहे व शासकीय वसतीगृहे या दोन स्वतंत्र योजना असून, अनुदानित वसतीगृहे ही योजना स्वयंसेवी संस्था या सेवाभावी पध्दतीवर चालवितात त्यासाठी आवश्यक निधी त्यांनी स्वत: उभा करुन विदयार्थ्यांना आवश्यक सुविधा पुरविणे अपेक्षित आहे.

तथापि या संस्थामध्ये मागासवर्गीय विदयार्थी असल्याने शासन या संस्थाना अर्थिक मदत म्हणुन परिपोषण अनुदान, इमारत भाडे व कर्मचारी मानधन यासाठी सहायक अनुदान देते.

अनुदानित वसतीगृहे व शासकीय वसतीगृहे या दोन स्वतंत्र योजना असल्याने या योजनांच्या सोई-सुविधांची तुलना करता येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दौंड (जि. पुणे) तालुक्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मान्यता दिलेली निवासी शाळा सुरु करण्याबाबत

**(४८) १२४७३९ (२६-०७-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या निवासी शाळेसाठी माहे मार्च एप्रिल, २०१८ वा त्यादरम्यान मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर शाळा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१८) :** (१) नाही.

शासकीय वसतीगृहाच्या पहारेकऱ्यांचे काम बाहयस्त्रोव्दारे खाजगी कंपनीकडून करुन घेण्यात येत असल्याने मानधनाचा प्रश्न येत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील चिंचोळी औदयोगिक वसाहत माळढोक पक्षी अभयारण्याच्या परिक्षेत्रातून वगळण्याबाबत

**(४९) १२५६७५ (०२-०८-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील चिंचोळी औदयोगिक वसाहत माळढोक पक्षी अभयारण्याच्या परिक्षेत्रातून वगळण्याचा निर्णय घेतला असल्याने या क्षेत्राला इको सेन्सेटिव्ह झोन जाहिर करण्यात आल्याने औदयोगिक विकासास बाधा निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभयारण्याच्या परिक्षेत्रातून वगळलेल्या औदयोगिक वसाहतीच्या इको सेन्सेटिव्ह झोन उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

माळढोक पक्षी अभयारण्याच्या परिक्षेत्रात Eco Sensitive Zone जाहीर करण्याची प्रक्रिया वन विभागाकडून चालू आहे.

(२) अभयारण्याच्या परिक्षेत्रात Eco Sensitive Zone मधून सोलापूर जिल्हयातील चिंचोली औद्योगिक क्षेत्र वगळणेबाबत उपवनसंरक्षक, उपविभाग, सोलापूर यांना दि. ०६/०३/२०१८, १८/०५/२०१८ व २६/०९/२०१८ रोजी प्रादेशिक कार्यालयाचे पत्रानुसार विनंती करण्यात आली आहे.

(३) कार्यवाही चालू आहे.

---

**कुडाळ औद्योगिक क्षेत्रातील (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील भूखंडाचे नियमबाहयरित्या झालेले हस्तांतरण**

**(५०) १२६२८१ (२०-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ औद्योगिक क्षेत्रातील (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) भूखंड क्रमांक २/१ मे.सिंधुदुर्ग सिमेंट प्रोडक्ट्स कंपनीने दिनांक १० मार्च १९९३ रोजी हस्तांतर आदेशान्वये मे.इस्को ट्रक स्लीपर्स प्रा.लि. कंपनीला हस्तांतरित केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हस्तांतर आदेशातील अटीनुसार हस्तांतरणानंतर अभिहस्तांतरण करार (Deed of Assignment) सादर करणे बंधनकारक असताना संबंधितांनी ते सादर केलेले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अभिहस्तांतरण करार (Deed of Assignment)u सादर केल्याशिवाय संबंधित कंपनीने सदर भूखंड हस्तांतरीत करणे नियमबाह्य ठरते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास,अभिहस्तांतरण करार (Deed of Assignment) सादर करणे बाबतची अट शिथिल करणे हे महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ रत्नागिरीचे प्रादेशिक अधिकारी यांचे अधिकार कक्षेबाहेरील आहे व त्यांनी Deed of Assignment सादर न करताच संबंधित कंपनीला मे. ए. एस. असोसिएट कंपनीला भूखंड हस्तांतरित करण्याची परवानगी दिली, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर नियमबाह्य हस्तांतरण रद्द करण्याबाबत केलेली कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-१२-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

भूखंड क्र. २/१ चे वाटप श्री अशोक शंकर कुबल, श्री कमलाकर राजाराम परब, सौ.स्वाती शशिकांत कुबल आणि सौ.मिनाक्षा परब, भागीदार, मे. सिंधुदूर्ग सिमेंट प्रोडक्टस या भागिदारी संस्थेस करण्यात आले होते. त्यानंतर सदर भागीदारी संस्थेच्या भागधारकात बदल होऊन मूळ भागिदार निवृत्त झाल्याने श्री.शांतलिंग शिवशरणअप्पा पाटील, श्री.प्रकाश दुंडप्पा लिगडे, आणि मे.इस्को ट्रक स्लिपर्स प्रा. लि. भागिदार मे.सिंधुदूर्ग सिमेंट प्रोडक्टस यांचे नांवे दि. १०.०३.१९९३ च्या हस्तांतर आदेशान्वये हस्तांतरीत करण्यात आला आहे. मे.इस्को ट्रक स्लिपर्स प्रा. लि. ही कंपनी मे. सिंधुदूर्ग सिमेंट प्रोडक्टस या भागीदारी संस्थेमध्ये भागिदार आहे.

(२) व (३) हे खरे असून अशा परिस्थितीत विहित प्रक्रियांचा अवलंब करुन महामंडळाने प्रचलित धोरणानुसार हस्तांतरण केले आहे.

(४) हे खरे नाही महामंडळाच्या मंजुरीने नियमानुसार प्रादेशिक अधिकारी यांनी Deed of Assignment करण्याची अट शिथील केलेली असुन सदर भूखंड मे.ए. एस. असोसिएट यांना हस्तांतर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन,**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव (कार्यभार)**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.